16:00:24 **स. क्रि.केस नं. ५८८/२०२४**

महाराष्ट्र शासन वि. वसंत शिवराम सावंत

**निशाण नं.११/क**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी.</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नांव – विलास भिवाजी गुरव

वय – ३७ वर्षे

धंदा – शेती

राहणार – सातवे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ. डी. बी. पाटील यांचेतर्फे सुरु,</u>**

१. दि. ०५.०४.२०२४ रोजी मला सातवे गावच्या स्मशानभूमी जवळ बोलविले नव्हते. आरोपी हे घराच्या पाठीमागे उघडयावर कागदी बॉक्स घेवून बसले होते व त्यामध्ये दारू माल मिळून आला व त्याचा पंचनामा केला असे घडले नाही.

**(साक्षीदार सरकार पक्षास पूरक उत्तरे देत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांना उलट प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येत आहे.)**

२. आता मला दाखविण्यात आलेल्या पंचनाम्यावरील सही माझी नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५.०४.२०२४ रोजी आरोपी यांच्या घराच्या पाठीमागे मला व दुसरे पंच भरत धनवडे यांना पंचनाम्याकरिता बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी तसेच दुसरे पंच व पोलीस स्टाफ हे आरोपी यांच्या घराच्या पाठीमागे गेलो असता तेथे आरोपी समोर कागदी बॉक्स घेवून बसलेला दिसला, त्याच्या संशय आल्यामुळे त्याला जागीच पकडले, त्याला त्याचे नाव गाव

विचारले असता त्याने त्याचे नाव वसंत शिवराम सावंत रा. सातवे असे सांगितले, त्याच्या जवळ असलेल्या समोर बॉक्सची पाहणी केली असता देशी दारु संत्रा १८० मिली सिलबंद १४ बाटल्या आढळून आल्या, तो मुद्देमाल ताब्यात घेतला व त्यापैकी एक बाटली परिक्षणाकरिता बाजूला काढण्यात आली, त्यावर आमच्या सहयांचे कागदी लेबल चिकटवून त्यावर लाखेचे सील करण्यात आले, या सर्व बाबींचा व घटनास्थळाचा मुद्देमाल जप्त करून पंचनामा करण्यात आला.

३. माझे शिक्षण दहावी पर्यंत झालेले आहे मला मराठी लिहीता व वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, मी कोणत्याही कागदावर सही करण्यापूर्वी त्यामधील मजकूर बरोबर असल्याची खात्री करून मगच त्यावर सही करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी सातवे गावात राहतो व  शेती करतो त्यामुळे गावातील लोकांना मी ओळखतो. आरोपी यास मी ओळखतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. आरोपी व माझी चांगली ओळख नाही. आरोपी सोबत माझी लांबून ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी वयस्कर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या गावातील व्यक्ती असून त्याला शिक्षा होवू नये असे मला वाटत नाही त्यामुळे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी माझी सही पंचनाम्यावर नाही असे खोटे सांगून खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी वकील श्रीमती. बी. बी. आंबेकर यांचेमार्फत सुरु,**

५. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनाम्याकरिता गेलो नव्हतो.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

16:10:33

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/–

**(के.दि.काकतकर)**

दिनांक. २४.०२.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा